**जनकल्याण मल्टीस्टेट  को.ऑप. क्रेडिट सोसायटी, सोलापूर कडून**

**जनकल्याण पतसंस्था, कराडचा**

**"जनकल्याण राज्यस्तरीय गौरव पुरस्कार २०२६"  देऊन सन्मान...**

बुधवार दि. ०३.०६.२०२६ रोजी जनकल्याण मल्टीस्टेट को.ऑप. क्रेडिट सोसायटी लि., सोलापूर कडून संस्थेच्या १४ व्या वर्धापन दिनानिमीत्त समाजातील विविध क्षेत्रात विशेष कार्य करणा-या आणि योगदान देणा-या संस्था आणि व्यक्तींना जनकल्याण राज्यस्तरीय गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

या क्रार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सोलापूर येथील सुप्रसिध्द उदयोजक मा. श्री. राजेश दमाणी होते तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिध्द इतिहास संशोधक मा. श्री. श्रीमंत कोकाटे उपस्थित होते.

आपल्या संस्थेचा आर्थिक आणि सहकार क्षेत्रातील विशेष योगदानाबद्दल मा.श्री. श्रीमंत कोकाटे आणि मा. श्री. राजेश दमाणी यांचे शुभहस्ते मानपत्र व गौरव चिन्ह देऊन सन्मान करण्यात आला.

संस्थेच्या वतीने संस्थेचे संचालक श्री. दिपकराव जोशी, मुख्य्य कार्यकारी अधिकारी श्री. विनायक फडके आणि उप-महाव्यवस्थापक श्री. हेमंत साळुंखे यांनी हा पुरस्कार स्विकारला. संचालक श्री. दिपकराव जोशी यांनी आपल्या मनोगतामध्ये आपल्या संस्थेच्या गौरवपुर्ण कार्याचा उल्लेख केला आणि सन्मान व पुरस्कारासाठी जनकल्याण मल्टीस्टेट को. ऑप. क्रेडिट सोसायटी लि.,सोलापूरचे संस्थापक व विद्यमान अध्यक्ष श्री. राजेंद्र हजारे आणि त्यांच्या समस्त संचालक मंडळाचे आभार मानले.


जनकल्याण
मल्टीस्टेट को.ऑप.क्रेडिट
सोसायटी लि.,सोलापूर
जनकल्याण
फौंडेशन
जनकल्याण राज्यस्तरीय
गौरव


जनकल्याण
फौंडेशन

**जनकल्याण**
मल्टीस्टेट को.ऑप.क्रेडिट
सोसायटी लि., सोलापूर

जनकल्याणासाठी निरंतर वाटचाली

**जनकल्याण**
फौंडेशन

## जनकल्याण राज्यस्तरीय गौरव पुरस्कार २०२६

# मानपत्र

## जनकल्याण नागरी सह. पतसंस्था, मर्या; कराड

संस्थेच्या नावातील 'जनकल्याण' हे शब्द केवळ शब्द म्हणून नव्हे तर संकल्पना मानून तिच्याशी बांधिलकी स्वीकारत आपण तीन दशके सामान्य माणसाच्या उत्थापनाचे जे व्रत हाती घेतले आहे त्याला आदर्शवत मानून हा मानपत्ररुपी मानाचा मुजरा करण्यात जनकल्याण मल्टिस्टेट, सोलापूर या संस्थेला विलक्षण अभिमान वाटत आहे.

व्यक्तिमात्राला आपले जीवन यशस्वी करावयाचे असेल तर त्याला आर्थिक निर्भरता आणि सुरक्षितता आवश्यक आहे हे लक्षात घेऊन या पतसंस्थेची स्थापना करण्यात आली. संस्थेने गेल्या ३० वर्षात या माध्यमातून आपल्या ५० हजारापेक्षाही अधिक सभासदांच्या जीवनामध्ये मोठे परिवर्तन घडवले आहे.

सातारा, सांगली, कोल्हापूर आणि पुणे या चार जिल्ह्यांचे कार्यक्षेत्र डोळ्यासमोर ठेवून आपण अगदी सामान्य स्थितीत सुरू केलेले हे सेवाभावी कार्य आज १७ शाखांच्या स्वरूपात विस्तारले आहे. एक सहकारी पतसंस्था ९०० कोटी रुपयांचा व्यवसाय करून १००० कोटीच्या लक्ष्याकडे समर्थपणे वाटचाल करते हे सहकार क्षेत्रातले एक नवल आहे.

सर्वसमावेशक अर्थकारणातून समाजहित साधणे हे आपले ध्येय आहे. या ध्येयाच्या मार्गावर आपण पारदर्शकपणे वाटचाल केलेली आहे. राष्ट्रीय स्तरावर बँकिंग लायसन्स करिता केंद्र सरकारने केलेल्या पाहणीत आपला देश पातळीवर पाचवा क्रमांक आलेला आहे हे केवळ आपल्या संस्थेसाठीच नव्हे तर महाराष्ट्रासाठी अभिमानास्पद आहे.

आपल्या संस्थेचे हे देदीप्यमान कार्य इतर अनेक संस्थांना मार्गदर्शक ठरल्यामुळे महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशनने आपल्या संस्थेचा 'दीपस्तंभ' पुरस्कार देऊन गौरव केला आहे हे उचितच आहे. इतरही अनेक संस्थांनी आपल्या संस्थेला वेळोवेळी प्रतिष्ठेचे पुरस्कार देऊन गौरविले आहे.

सामान्य माणसाच्या बचतीतूनच त्याचा आर्थिक उत्कर्ष घडवण्याचा सहकार हा मोठा अद्भुत वाटावा असा मार्ग आहे. त्यातून आपण सभासदांचे कल्याण तर केले आहेच परंतु ते करताना समाजऋणाची फेड करण्याच्या भावनेतून विविध सामाजिक संस्थांना दोन कोटी ५० लाख रुपयांची मदत केलेली आहे.

आपण एक लाख रुपयांचा जनकल्याण गौरव पुरस्कार देऊन समाजातल्या गुणवंतांचा सत्कार करता हे सुद्धा आपल्या सामाजिक दायित्वाच्या भावनेचे द्योतक आहे.

आपल्या या स्पृहणीय कार्यासाठी राज्यातल्या सामान्य माणसाच्या वतीने आम्ही हे मानपत्र अर्पण करत आहोत. ते इतर अनेक संस्थांना प्रेरणादायी ठरणार आहे. आपण या मानपत्राचा स्वीकार करावा ही नम्र विनंती. आपल्या उज्वल कार्यास आमच्या हार्दिक शुभेच्छा

श्री. राजेंद्र पुंडलिक हजारे
संस्थापक-चेअरमन

विराक्षी, 8600086001